**इंगलवाडी (सं.) लघु पाटबंधारे योजना**
**ता. मानोरा जि. वाशिम**
**योजनेस प्रथम सुधारीत प्रशासकीय**
**मान्यता प्रदान करणेबाबत**

# विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर

**महामंडळ निर्णय क्रमांक: ३०९ : विपाविम/कातां ७(१)/ (धा.क्र १/२०१९)/ इंगलवाडी (सं.) लपायो / प्रथम सुप्रमा / २०१९, दि. २०/०९/२०१९**

**पहावे:-** १. महामंडळाचा निर्णय क्र. विपाविम/ कातां ६/३०६/ इंगलवाडी /प्रमा/(५७/२००८)/२००८, दि. २२.७.२००८
२. शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१५/(३५/२०१५)/जसं(आ), दि. ०९.०९.२०१५.
३. राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नासिक यांचे पत्र. क्र. रातांसस(१)/ इंगलवाडी (सं.) लपायो / (धा.क्र.७७/२०१८)/९५/२०१९, दि. २४.१.२०१९
४. अतिरीक्त मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, यांचे अध्यक्षतेखाली दि.१२.३.१९ रोजी झालेल्या सचिव स्तरावरील उपसमितीच्या बैठकीचे इतिवृत्त क्र. बैठक-२०१९/(१८३/२०१९)/लपा, दि. १४.५.२०१९
५. विपाविम नियामक मंडळाचे दि. १२.०६.२०१९ रोजी संपन्न ७४ व्या बैठकीतील ठराव क्र. ७४/२

**प्रस्तावाना :**

इंगलवाडी (सं.) लघु पाटबंधारे योजना, हा प्रकल्प या महामंडळांतर्गत वाशिम जिल्ह्यातील मानोरा तालुक्यातील इंगलवाडी गावाजवळ स्थानिक नाल्यावर बांधण्यात येत आहे. सदर प्रकल्पामुळे वाशिम जिल्ह्यातील ३ गावांमधील ३१४ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. सदर प्रकल्प अमरावती प्रदेशातील अनुशेष दुरू करण्यासाठी नियोजित प्रकल्पांपैकी आहे. सदर प्रकल्प बळीराजा जलसंजिवनी योजनेत समाविष्ट आहे.

इंगलवाडी (सं.) लघु पाटबंधारे योजनेस संदर्भ क्र. १ नुसार सन २००७-०८ चे दरसुचीवर आधारीत रू. ६३८.०० लक्ष (रू. सहा कोटी, अडतीस लक्ष फक्त) इतक्या रकमेस मुळ प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती.

बांधकामाचे दरम्यान योजनेच्या खर्चात दरसुचीतील बदलामुळे झालेली वाढ, जास्त दराच्या निविदा स्विकृतीमुळे वाढ, भूसंपादन खर्चातील वाढ, संकल्पनातील बदल , इतर कारणे व अनुषंगीक खर्च इत्यादी कारणामुळे वाढ झाली असून योजनेची अद्यावत किंमत मुळ प्रशासकीय मान्यता किंमतीच्या दहा टक्क्याहून अधिक वाढत असल्यामुळे व सदर प्रकल्प बळीराजा जलसंजिवनी योजना कार्यक्रमातंर्गत असल्याने, प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करणे आवश्यक झाले आहे .

इंगलवाडी (सं.) लघु पाटबंधारे योजनेच्या प्रथम सुप्रमा प्रस्तावाबाबत महामंडळ स्तरावर छाननीअंती तयार केलेल्या छाननी अहवालाचा मुल्यार्पण अहवाल राज्यस्तरीय तांत्रीक सल्लागार समिती(१), नाशिक, यांचे दि. २७.११.२०१८ रोजीच्या १२३ व्या बैठकीत अंतिम करण्यात आला असून पुढील कार्यवाहीस्तव संदर्भिय पत्र क्र. ३ नुसार प्राप्त झालेला आहे.

इंगलवाडी (सं.) लघु पाटबंधारे योजनेच्या प्रथम सुप्रमा प्रस्तावावर अतिरीक्त मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, यांचे अध्यक्षतेखाली दि.१२.३.२०१९ रोजी झालेल्या मा. सचिव उपसमितीचे बैठकीत चर्चा होवून प्रस्ताव नियामक मंडळासमोर पुढील निर्णयार्थ सादर करण्यास सहमती दर्शविण्यात आली आहे.

संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयानुसार विदर्भातील प्रकल्पांना सु.प्र.मा. देण्याचे अधिकार महामंडळास प्रदान करण्यात आलेले आहेत.

दि. १२.०६.२०१९ रोजी झालेल्या नियामक मंडळाचे ७४ व्या बैठकीतील ठराव क्र. ७४/२ नुसार इंगलवाडी (सं.) लघु पाटबंधारे योजनेच्या रू. १७७६.०० लक्ष अंदाजित किंमतीच्या प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावास मा. सचिव उपसमितीने उपस्थित केलेल्या मुद्यांचे अनुपालनाचे अधीन राहून मान्यता दिली असून या बाबतचे आदेश कार्यकारी संचालक यांनी निर्गमित करण्याकरिता नियामक मंडळाने मान्यता प्रदान केलेली आहे.

सदर प्रकल्पाची प्रशासकीय मान्यता किंमत रू. ६३८.०० लक्ष च्या तुलनेत प्रथम सुप्रमा अहवालानुसार प्रकल्पाची किंमत रू. ११३८.०० लक्षाने जास्त आहे. किंमत वाढीची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेत:-

| अ.क्र. | बाब | वाढ रू लक्ष | मंजूर प्रमा किंमतीच्या तुलनेत वाढीची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | दरसुचीतील बदलामुळे वाढ | ५२८.०० | ८२.७६ % |
| २ | जादा दराच्या निविदा स्विकृतीमुळे वाढ | १४.०० | २.१९ % |
| ३ | भूसंपादनाच्या किंमतीतील वाढ | २०६.०० | ३२.२९ % |
| ४ | संकल्पचित्रातील बदलामुळे झालेली वाढ | १७४.०० | २७.२७ % |
| ५ | अपू-या तरतुदी व सर्वेक्षणामुळे झालेली वाढ | १०७.०० | १६.७८ % |
| ६ | इतर कारणांमुळे झालेली वाढ | ७९.०० | १२.३८ % |
| ७ | अनुषंगीक खर्च वाढ | ३०.०० | ४.७० % |
| | एकूण | ११३८.०० | १७८.३७ % |

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचा निर्णय :**

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ आता या निर्णयान्वये वाशिम जिल्ह्यातील इंगलवाडी (सं.) लघु पाटबंधारे योजना, ता. मानोरा जि. वाशिम या योजनेच्या एकूण अंदाजित खर्च रू. १७७६.०० लक्ष (रू. सतरा कोटी, शहात्तर लक्ष फक्त) किंमतीस प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करीत आहे. त्यापैकी रू. १६४९.०० लक्ष (रू. सोळा कोटी एकोणपन्नास लक्ष फक्त) कामाप्रित्यर्थ व रू. १२७.०० लक्ष (रू. एक कोटी सत्तावीस लक्ष फक्त) अनुषंगिक खर्च आहे. अंदाजपत्रकात उर्वरीत कामांसाठी जलसंपदा विभागाची सन २०१७-१८ या वर्षाच्या दरसूचीप्रमाणे दर वापरण्यात आले आहेत. उपशिर्षवार तरतुदींचा गोषवारा परिशिष्ट-१ मध्ये संलग्न आहे.

**१. ठळक बाबी –**

| | |
|---|---|
| **अ) योजनेचे सिंचन क्षेत्र** | **- ३१४ हेक्टर** |
| **ब) योजनेमुळे एकुण होणारा पाणीसाठा** | **- १.९१ द.ल.घ.मी. (१९१०.० स.घ.मी.)** |
| **क) प्रति स.घ.मी. पाणीसाठा किंमत** | **- रू.८९९८७/-(मापदंड रू.१२२१३२ x ९०%=१०९९१९/- प्रती स.घ.मी.)** |
| **ड) योजनेचे लाभव्यय गुणोत्तर** | **- १.५१ (मापदंड १.०० पेक्षा जास्त)** |

**इ) योजनेचा आर्थिक परतावा दर (ERR)- १५.७८% (मापदंड किमान १२%)**

२. या योजनेच्या कामावरील खर्च मागणी क्र.आय -५, मुख्य लेखाशिर्ष "४७०२", लघु पाटबंधारे यावरील भांडवली खर्च, (८०)- सर्वसाधारण, (१९०)-सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणुका (००) (०५), विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ भाग भांडवली अंशदान (४७०२ ५१०-१) या लेखाशीर्षाखाली खर्ची घालावा व विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडील मंजुर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. या योजनेस प्रदान केलेली प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता (२१/२०१९) या अनुक्रमांकावर नोंदविण्यात आली आहे.

४. सदर प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

४.१) सदर सुधारित प्रशासकीय मान्यता म्हणजे प्रकल्प कार्यान्वयीन करण्याच्या विविध टप्प्यावर झालेल्या अनियमिततेस मान्यता गृहीत धरता येणार नाही.

४.२) या प्रकल्पाबाबत चालू असलेल्या अथवा प्रस्तावित विभागीय चौकशी कार्यवाही पूढे चालू ठेवावी. प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याच्या निर्णयामुळे विभागीय चौकशीच्या कार्यवाहीस कोणतीही बाधा पोहचणार नाही.

४.३) आर्थिक दायित्व निर्माण होईल अशा नवीन घटकांचा शासन मान्यतेशिवाय समावेश करण्यात येऊ नये.

४.४) प्रगतीपथावरील निविदांची कामे प्राधान्याने पूर्ण करण्यात यावीत. पाणीसाठ्याचा सिंचनाकरीता जास्तीतजास्त लाभ होईल अशा प्रकारे उर्वरित कामांचा प्राधान्यक्रम निश्चित करण्यात यावा व त्यानुसार कामे/निविदा प्रक्रिया करण्यात यावी.

४.५) सदर प्रकल्पासाठी कोणत्याही प्रयोजनार्थ मंजूर प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेबाहेर जाऊन निधी वितरण अथवा अतिरीक्त खर्च करता येणार नाही. या संदर्भात प्रचलित शासन निर्णय, CWC ची मार्गदर्शक तत्वे, वित्त अधिकार मर्यादा, विहित केलेली निविदा कार्यपध्दती यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

४.६) राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या मुल्यार्पण अहवालात नमुद मुद्दा क्र. १ ते ६ चे अनुपालन करण्यात यावे.

४.७) मा. सचिव उपसमितीने उपस्थित केलेल्या मुद्यांचे अनुपालन करण्यात यावे.

४.८) प्रकल्पाचे काम नियोजना नुसार पूर्ण करण्यात यावे.

५. सदर महामंडळ निर्णयाची अंमलबजावणी निर्गमित दिनांकापासून करण्यात यावी.

६. सदर निर्णय जलसंपदा विभागाचे wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळा वरील विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे Mini Web Portal वर उपलब्ध करण्यात आला आहे.

**"मुळ प्रत मा. कार्यकारी संचालक यांना मान्य"**

**अधीक्षक अभियंता**
विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,
नागपूर

**प्रत,**
१. स्वीय सहाय्यक, मा. मंत्री, जलसंपदा, मंत्रालय, मुंबई.-३२
२. प्रधान सचिव (जसं प्र व वि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
३. सचिव (जसंव्य व लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
४. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
५. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा परिक्षा), नागपूर.
६. वित्त विभाग, (व्यय-१२) मंत्रालय, मुंबई -३२
७. नियोजन विभाग, (कार्यासन १४३४), मंत्रालय, मुंबई -३२
८. आयुक्त, अमरावती प्रदेश, अमरावती.
९. मुख्य अभियंता, विशेष प्रकल्प, जलसंपदा विभाग, अमरावती.
१०. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, महामंडळ कार्यालय, नागपूर.
११. जिल्हाधिकारी, वाशिम.
१२. अधीक्षक अभियंता, वाशिम पाटबंधारे मंडळ, वाशिम.
१३. कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग (बांधकाम), कारंजा.
१४. विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क संचालनालय, अमरावती
१५. कातां ७(१), संग्रहार्थ. १६. चित्र शाखा, संग्रहार्थ.

इंगलवाडी (सं.) लघु पाटबंधारे योजना
ता. मानोरा जि. वाशिम
प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता.

महामंडळाचा निर्णय क्रमांक :

३०९ /विपाविम/कातां.७(१)/ (धा. क्र. १/२०१९)/ इंगलवाडी (सं.) / प्रथम सुप्रमा-/२०१९,
दिनांक : २०-९-१९ चे सहपत्र

परिशिष्ट-१

इंगलवाडी (सं.) लघु पाटबंधारे योजना

ता. मानोरा जि. वाशिम

उपशिर्षवार तरतूदींचा गोषवारा

किंमत रु. लक्ष

| अ. क्र. | उपशीर्ष | प्रथम सुप्रमानुसार तरतूद (दरसूची १७-१८) |
|---|---|---|
| १. | अ- प्राथमिक | ४.० |
| २. | ब-भूसंपादन | ३६५.० |
| ३. | सी –कामे | ११४२.०० |
| ४. | डी-विमोचक | ३३.०० |
| ५. | के-इमारती | ६.०० |
| ६. | एम-वृक्षारोपण | १.०० |
| ७. | ओ – किरकोळ कामे | २.०० |
| ८. | पी- व्यवस्थापन | १२.०० |
| ९. | आर- दळणवळण | ८४.०० |
| | एकूण | १६४९.०० |
| | अनुषंगीक खर्च | १२७.०० |
| | एकूण किंमत | १७७६.०० |

"मुळ प्रत मा. कार्यकारी संचालक यांना मान्य"

अधीक्षक अभियंता
विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,
नागपूर

**रापेरी (सं.) लघु पाटबंधारे योजना**
**ता. कारंजा जि. वाशिम**
**योजनेस प्रथम सुधारीत प्रशासकीय**
**मान्यता प्रदान करणेबाबत.**

# विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर

**महामंडळ निर्णय क्रमांक: 390 विपाविम/कातां ७(१)/ (धा.क्र.११/२०१७)/ रापेरी (सं.) लपायो / प्रथम सुप्रमा / २०१९, दि. २०/०९/२०१९**

**पहावे :-** १. महामंडळाचा निर्णय क्र. विपाविम/ कातां ७/४२४/ रापेरी /प्रमा/(४१/२०८/२००८), दि. ३०.९.२००८
२. शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१५/(३५/२०१५)/जसं(आ), दि. ०९.०९.२०१५.
३. राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नासिक यांचे पत्र. क्र. रातांसस(१)/ रापेरी (सं.) / धा.क्र.७६ /२०१८)४५/२०१९, दि. ९.१.२०१९.
४. अतिरीक्त मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, यांचे अध्यक्षतेखाली दि.३१.०१.१९ रोजी झालेल्या सचिव स्तरावरील उपसमितीच्या बैठकीचे इतिवृत्त क्र. बैठक-२०१९/(७५/२०१९)/लपा, दि. १५.०२.२०१९
५. विपाविम नियामक मंडळाचे दि. १२.०२.२०१९ रोजी संपन्न ७३ व्या बैठकीतील ठराव क्र. ७३/५

**प्रस्तावना :**

रापेरी (सं.) लघु पाटबंधारे योजना, हा प्रकल्प या महामंडळांतर्गत वाशिम जिल्ह्यातील कारंजा तालुक्यातील रापेरी गावाजवळ स्थानिक नाल्यावर बांधण्यात येत आहे. सदर प्रकल्पामुळे वाशिम जिल्ह्यातील कारंजा तालुक्यातील २ गावातील ३६६ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. सदर प्रकल्प सिंचन अनुशेष असलेल्या वाशिम जिल्ह्यातील आहे. या प्रकल्पाचा समावेश बळीराजा जलसंजिवनी योजनेमध्ये करण्यात आलेला आहे.

रापेरी (सं.) लघु पाटबंधारे योजनेस संदर्भ क्र. १ नुसार सन २००८-०९ चे दरसुचीवर आधारीत रू. ६८४.०० लक्ष (रू. सहा कोटी, चौ-यांशी लक्ष फक्त) इतक्या रकमेस मुळ प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती.

बांधकामाचे दरम्यान योजनेच्या खर्चात दरसुचीतील बदलामुळे झालेली वाढ, जास्त दराच्या निविदा स्विकृतीमुळे वाढ, भुसंपादन खर्चातील वाढ, संकल्पनातील बदल , इतर कारणे व अनुषंगिक खर्च इत्यादी कारणामुळे वाढ झाली असून योजनेची अद्यावत किंमत मुळ प्रशासकीय मान्यता किंमतीच्या दहा टक्क्याहून अधिक वाढत असल्यामुळे व सदर प्रकल्प बळीराजा जलसंजीवनी योजना कार्यक्रमा अंतर्गत असल्याने, प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करणे आवश्यक झाले आहे .

रापेरी (सं.) लघु पाटबंधारे योजनेचा प्रथम सुप्रमा बाबतचा छाननी अहवाल राज्यस्तरीय तांत्रीक सल्लागार समिती(१), नाशिक, यांचे दि. २७.११.२०१८ रोजीच्या १२३ व्या बैठकीत अंतिम करण्यात आला असून पुढील कार्यवाहीस्तव संदर्भिय पत्र क्र. ३ नुसार प्राप्त झालेला आहे.

रापेरी (सं.) लघु पाटबंधारे योजनेच्या प्रथम सुप्रमा प्रस्तावावर अतिरीक्त मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, यांचे अध्यक्षतेखाली दि.३१.०१.२०१९ रोजी झालेल्या मा. सचिव उपसमितीचे बैठकीत चर्चा होवून प्रस्ताव नियामक मंडळासमोर पुढील निर्णयार्थ सादर करण्यास सहमती दर्शविण्यात आली आहे.

संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयानुसार विदर्भातील प्रकल्पांना सु.प्र.मा. देण्याचे अधिकार महामंडळास प्रदान करण्यात आलेले आहेत.

दि. १२.०२.२०१९ रोजी झालेल्या नियामक मंडळाचे ७३ व्या बैठकीतील ठराव क्र. ७३/५ नुसार रापेरी (सं.) लघु पाटबंधारे योजनेच्या रू. २८००.०० लक्ष अंदाजित किंमतीच्या प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावास मा.

सचिव उपसमितीने उपस्थित केलेल्या मुद्यांचे अनुपालनाचे अधीन राहून मान्यता दिली असून या बाबतचे आदेश कार्यकारी संचालक यांनी निर्गमित करण्याकरिता नियामक मंडळाने मान्यता प्रदान केलेली आहे.

सदर प्रकल्पाची प्रशासकीय मान्यता किंमत रू. ६८४.०० लक्ष च्या तुलनेत प्रथम सुधारित प्रकल्प अहवालाची किंमत रू. २११६.०० लक्षाने जास्त आहे. किंमत वाढीची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेत:-

| अ.क्र. | बाब | वाढ रू लक्ष | प्रमा तुलनेत वाढीची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | दरसुचीतील बदलामुळे वाढ | ५२८.०० | ७७.३० % |
| २ | जादा दराच्या निविदा स्विकृतीमुळे वाढ | २४.०० | ३.५१ % |
| ३ | भूसंपादनाच्या किंमतीतील वाढ | १४५२.०० | २१२.४५ % |
| ४ | संकल्पचित्रातील बदलामुळे झालेली वाढ | ४८.०० | ७.०३ % |
| ५ | इतर कारणांमुळे झालेली वाढ | ६४.०० | ९.५२ % |
| | एकुण | २११६.०० | ३०९.८१ % |

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचा निर्णय :**

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ आता या निर्णयान्वये वाशिम जिल्ह्यातील रापेरी (सं.) लघु पाटबंधारे योजना, ता. कारंजा जि. वाशिम या योजनेच्या एकूण अंदाजित खर्च रू. २८००.०० लक्ष (रू. अठ्ठावीस कोटी फक्त) किंमतीस प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करीत आहे. त्यापैकी रू. २६९१.०० लक्ष (रू. सव्वीस कोटी एक्याण्णव लक्ष फक्त) कामाप्रित्यर्थ व रू. १०९.०० लक्ष (रू. एक कोटी नऊ लक्ष फक्त) अनुषंगिक खर्च आहे. अंदाजपत्रकात उर्वरीत कामांसाठी जलसंपदा विभागाची सन २०१७-१८ या वर्षाच्या दरसूचीप्रमाणे दर वापरण्यात आले आहेत. उपशिर्षवार तरतुदींचा गोषवारा परिशिष्ट-१ मध्ये संलग्न आहे.

१. ठळक बाबी –

| | |
|---|---|
| **अ) योजनेचे सिंचन क्षेत्र** | **- ३६६ हेक्टर** |
| **ब) योजनेमुळे एकुण होणारा पाणीसाठा** | **- २.०३७९ द.ल.घ.मी. (२०३७.९० स.घ.मी.)** |
| **क) प्रति स.घ.मी. पाणीसाठा किंमत** | **-रू.१३७३४४/-(मापदंडरू.१२२१३२ x ९०%=१०९९१९/- प्रती स.घ.मी.)** |
| **ड) योजनेचे लाभव्यय गुणोत्तर** | **- १.१४ (मापदंड १.०० पेक्षा जास्त)** |

२. या योजनेच्या कामावरील खर्च मागणी क्र.आय -५, मुख्य लेखाशिर्ष "४७०२", लघु पाटबंधारे यावरील भांडवली खर्च, (८०)- सर्वसाधारण, (१९०)-सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणुका (००) (०५), विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ भाग भांडवली अंशदान (४७०२ ५१०-१) या लेखाशीर्षाखाली खर्ची घालावा व विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडील मंजुर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. या योजनेस प्रदान केलेली प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता (१५/२०१९) या अनुक्रमांकावर नोंदविण्यात आली आहे.

४. सदर प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

४.१) सदर सुधारित प्रशासकीय मान्यता म्हणजे प्रकल्प कार्यान्वयीन करण्याच्या विविध टप्प्यावर झालेल्या अनियमिततेस मान्यता गृहीत धरता येणार नाही.

४.२) या प्रकल्पाबाबत चालू असलेल्या अथवा प्रस्तावित विभागीय चौकशी कार्यवाही पूढे चालू ठेवावी. प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याच्या निर्णयामुळे विभागीय चौकशीच्या कार्यवाहीस कोणतीही बाधा पोहचणार नाही.

४.३) आर्थिक दायित्व निर्माण होईल अशा नवीन घटकांचा शासन मान्यतेशिवाय समावेश करण्यात येऊ नये.

४.४) प्रगतीपथावरील निविदांची कामे प्राधान्याने पूर्ण करण्यात यावीत. पाणीसाठ्याचा सिंचनाकरीता जास्तीतजास्त लाभ होईल अशा प्रकारे उर्वरित कामांचा प्राधान्यक्रम निश्चित करण्यात यावा व त्यानुसार कामे/निविदा प्रक्रिया करण्यात यावी.

४.५) सदर प्रकल्पासाठी कोणत्याही प्रयोजनार्थ मंजूर प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेबाहेर जाऊन निधी वितरण अथवा अतिरीक्त खर्च करता येणार नाही. या संदर्भात प्रचलित शासन निर्णय, CWC ची मार्गदर्शक तत्वे, वित्त अधिकार मर्यादा, विहित केलेली निविदा कार्यपध्दती यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

४.६) राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या छाननी अहवालात नमुद मुद्दा क्र. २६ व २७ चे अनुपालन करण्यात यावे.

४.७) मा. सचिव उपसमितीने उपस्थित केलेल्या मुद्यांचे अनुपालन करण्यात यावे.

४.८) प्रकल्पाचे काम नियोजना नुसार पूर्ण करण्यात यावे.

५. सदर महामंडळ निर्णयाची अंमलबजावणी निर्गमित दिनांकापासून करण्यात यावी.

६. सदर निर्णय जलसंपदा विभागाचे wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळा वरील विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे Mini Web Portal वर उपलब्ध करण्यात आला आहे.

"मुळ प्रत मा. कार्यकारी संचालक यांना मान्य"

अधीक्षक अभियंता
विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,
नागपूर

प्रत सहपत्रासह,

१. स्वीय सहाय्यक, मा. मंत्री, जलसंपदा, मंत्रालय, मुंबई.-३२
२. प्रधान सचिव (जसं प्र व वि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
३. सचिव (जसंव्य व लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
४. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
५. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा परिक्षा), नागपूर.
६. वित्त विभाग, (व्यय-१२) मंत्रालय, मुंबई -३२
७. नियोजन विभाग, (कार्यासन १४३४), मंत्रालय, मुंबई -३२
८. आयुक्त, अमरावती प्रदेश, अमरावती.
९. मुख्य अभियंता, विशेष प्रकल्प, जलसंपदा विभाग, अमरावती.
१०. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, महामंडळ कार्यालय, नागपूर.
११. जिल्हाधिकारी, वाशिम.
१२. अधीक्षक अभियंता, वाशिम पाटबंधारे मंडळ, वाशिम.
१३. कार्यकारी अभियंता, लघू पाटबंधारे विभाग (बांधकाम), कारंजा.
१४. विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क संचालनालय, अमरावती
१५. कातां ७(१), संग्रहार्थ.
१६. चित्र शाखा, संग्रहार्थ.

*\\Kt7\e\KT 7(1)WIC\Folder 2019\8-Aug 19\RA1 given in month\Draft order Raperi (sto) MIS VIDC RAA 16.8.2019.doc*

रापेरी (सं.) लघु पाटबंधारे योजना
ता. कारंजा जि. वाशिम
**प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता.**

**महामंडळाचा निर्णय क्रमांक :**

/विपाविम/कातां.७(१)/ (धा. क्र. ११/२०१७)/ रापेरी (सं.)/ प्रथम सुप्रमा-/२०१९,

दिनांक : चे सहपत्र

**परिशिष्ट-१**

**रापेरी (सं.) लघु पाटबंधारे योजना**

**ता. कारंजा जि. वाशिम**

**उपशिर्षवार तरतूदींचा गोषवारा**

**किंमत रु. लक्ष**

| अ. क्र. | उपशीर्ष | व्दितीय सुप्रमानुसार तरतूद (दरसूची १७-१८) |
|---|---|---|
| १. | अ- प्राथमिक | ४.० |
| २. | ब-भूसंपादन | १५९४.० |
| ३. | सी –कामे | १०४१.०० |
| ४. | डी-विमोचक | १९.०० |
| ५. | के-इमारती | ५.०० |
| ६ | एम- वृक्षारोपन | १.०० |
| ७ | ओ-किरकोळ कामे | २.०० |
| ८ | पी- देखभाल | ५.०० |
| ९ | आर- दळणवळण | २०.०० |
| | **एकुण** | २६९१.०० |
| | **अनुषंगिक खर्च** | १०९.०० |
| | **एकुण किंमत** | २८००.०० |

"मुळ प्रत मा. कार्यकारी संचालक यांना मान्य"

अधीक्षक अभियंता
विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,
नागपूर

K17\e KT 7(1)WIC\Folder 2019\8-Aug 19\RAA given in month\Draft order Raperi (sto) MIS VIDC RAA 16 8 2019 doc